## M. A. Economics (M50)

## Learning Outcomes Curriculum Framework

| Sr. No. | Name of the Program | Program Learning Outcomes | Program-Specific Learning Outcomes | Name of Course With Code | Course Learning Outcomes |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 1. | (M50) अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.ए.) | (M50) अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थांना......<br>१. अर्थव्यवस्थेचे स्वरुप, संकल्पना, सिद्धांत, आर्थिक तत्वज्ञान आणि वित्तीय व्यवस्थापनाविषयी दृष्टीकोन स्पष्ट होतो.<br>२. आर्थिक प्रक्रियेच्या अभ्यासातून नवीन रोजगार, स्वयं रोजगार, नोकरीच्या संधीस सक्षम होतात.<br>३. आर्थिक ज्ञानाचे सामाजिक हितासाठी दैनंदिन जीवनात उपयोजन करण्यास सक्षम होतात.<br>४. आर्थिक वर्तणुकीचे ज्ञान प्राप्त होऊन कल्याणकारी राज्याबद्दल जाणीव निर्माण होते.<br>५. आर्थिक विकासातील विविध निर्देशांकानुसार भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती स्पष्ट होते. | | मूलभूत आर्थिक सिद्धांत (ECO501) | ▪ अंशलक्ष्यी व समग्रलक्ष्यी अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पनांचे सैद्धांतिक व विश्लेषणात्मक आकलन प्राप्त होईल.<br>▪ मागणी-पुरवठा विश्लेषण, उत्पादन व खर्च सिद्धांत आणि बाजार रचनेनुसार निर्णय प्रक्रिया समजून घेतील.<br>▪ राष्ट्रीय उत्पन्न मापन, उत्पादन-रोजगार समतोल व मुद्राव्यवस्था यांचा सैद्धांतिक अभ्यास करता येईल.<br>▪ मौद्रिक व राजकोषीय धोरणांचे स्वरूप व परिणाम, व्यवहारतोल आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत स्पष्टपणे विश्लेषण करता येईल.<br>▪ आर्थिक निर्णय प्रक्रियेत सैद्धांतिक माहितीचा वापर करून तर्कसंगत विचार करू शकतील व धोरणे मांडू शकतील. |
| 2. | | | | विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन (ECO502) | ▪ आर्थिक वृद्धी व विकास यातील फरक, विकासाचे मापन व समस्या समजून स्वतंत्र विश्लेषण करू शकतील.<br>▪ सनातनवादी, पारंपरिक, आधुनिक विकास सिद्धांतांची तुलनात्मक मांडणी आणि विश्लेषण करता येईल.<br>▪ मानव विकास, पर्यावरण, जागतिक संस्था व धोरणात्मक घटकांचा आर्थिक विकासावर प्रभाव स्पष्ट करता येईल.<br>▪ भारतातील आर्थिक नियोजनाची प्रक्रिया, प्रकार, तंत्र व प्रभावीता समजून घेता येईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६. अर्थशास्त्रीय निर्णय व्यवस्थापनात पर्यावरणीय मापदंडाचा वापर करण्याची दृष्टी विकसित होते. | | | ▪ समाज, पर्यावरण आणि जागतिकीकरण विकासाचे बहुआयामी स्वरूप समजून घेऊन तर्कशुद्ध धोरणात्मक भूमिका मांडू शकतील. |
| 3. | | ७. संख्याशास्त्रीय व अर्थमितीचे ज्ञान, आर्थिक-सामाजिक समस्याविषयक चिकित्सक/ तर्कशुद्ध संशोधन वृत्ती निर्माण होते. | | कल्याणकारी अर्थशास्त्र (ECO503) | ▪ कल्याणकारी अर्थशास्त्राचे स्वरूप, मर्यादा व धोरणात्मक उपयोजन समजून घेतील.<br>▪ सनातनवादी आणि नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांचे सिद्धांतानुसार आर्थिक व सामाजिक कल्याणाची तात्त्विक चौकट तयार करता येईल.<br>▪ महत्तम कल्याण सिद्धांत, क्षतीपूरक तत्त्वे आणि सामाजिक कल्याण फलन यांचा तर्कसंगत उपयोग करता येईल.<br>▪ सरकारच्या हस्तक्षेपाचे औचित्य व परिणाम यांचे मूल्यमापन करू शकतील.<br>▪ कल्याणकारी अर्थशास्त्रातील आधुनिक सिद्धांतांमध्ये बर्गसन, सॅम्युअलसन, ॲरो इ. तुलनात्मक विश्लेषण करता येईल व त्यांचा वापर धोरण निर्मितीत करू शकतील. |
| 4. | | | | आर्थिक विचारांचा विकास – I (ECO504) | ▪ अर्थशास्त्राच्या विकासाचा कालानुक्रमिक मागोवा घेऊन विचारधारेतील विविध प्रवाह समजून घेतील.<br>▪ अभिजात विचारसरणीतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांचे योगदानाचे विश्लेषण करता येईल.<br>▪ मार्क्सवाद आणि शास्त्रीय समाजवादाची तत्त्वे व आधुनिक विचारांशी तुलना सुस्पष्टपणे करता येईल.<br>▪ सीमान्तवादी क्रांती व नवसनातनवादातील संकल्पनांची समज प्राप्त होईल.<br>▪ केन्सच्या क्रांतिकारी विचारसरणीचे वैशिष्ट्य व त्यानंतरचा आर्थिक विकास स्पष्टपणे मांडू शकतील व समकालीन अर्थशास्त्रातील मूळ प्रवाह ओळखू शकतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | | | | कृषी अर्थशास्त्र (ECO505) | ▪ कृषी अर्थशास्त्राची व्याप्ती, उत्पादन सिद्धांत आणि कृषीमालाच्या मागणी-पुरवठा यांचा अभ्यास करून आर्थिक विश्लेषण करू शकतील.<br>▪ भारतातील भू-सुधारणा, जलसिंचन आणि अन्नसुरक्षा धोरणांचे विश्लेषण करता येईल.<br>▪ कृषीमाल विपणनाची रचना, किंमत धोरण व पुरवठा साखळी व्यवस्थापन समजून घेऊन बाजारातील समस्यांची चिकित्सा करता येईल.<br>▪ कृषी वित्तपुरवठ्याचे विविध स्रोत, तत्त्वे व संकल्पना यांवर स्पष्ट व सुसंगत माहिती प्राप्त होईल.<br>▪ कृषी क्षेत्राशी संबंधित आत्महत्या, वित्तीय संकट यासारख्या सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण भूमिका घेऊन धोरणात्मक सूचना देऊ शकतील. |
| 6. | | | | श्रमाचे अर्थशास्त्र (ECO506) | ▪ श्रम बाजार, श्रमिकांच्या गतिशील समस्या व स्थलांतर प्रक्रिया समजून घेतील.<br>▪ कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील श्रमिकांचे स्वरूप आणि रोजगार निर्मितीतील धोरणांचे विश्लेषण करू शकतील.<br>▪ मजुरी निश्चिती, वेतन आयोग, बोनस व सामूहिक वाटाघाटीचे तत्त्व स्पष्ट करता येतील.<br>▪ जागतिकीकरणामुळे उत्पन्न बेकारी, श्रमकपात, श्रमिकांचे आर्थिक दारिद्र्य व सरकारची धोरणे यांचे समीक्षण करू शकतील.<br>▪ श्रम कल्याण योजनेची गरज, तिचा परिणाम व आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांचा प्रभाव समजून धोरणात्मक सूचना मांडू शकतील. |
| 7. | | | | संशोधन पद्धती (ECO599) | ▪ संशोधनाची संकल्पना, उद्दिष्टे, प्रकार, महत्त्व व अडचणी यांचे सखोल विश्लेषण करता येईल, तसेच संशोधन समस्या निवडून |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | तिचे परिभाषीकरण करून साहित्याचा शास्त्रीय आढावा घेता येईल.<br>▪ चांगला संशोधन प्रस्ताव व रचना तयार करता येईल आणि विविध संशोधन रचना/प्रायोगिक रचनांची तुलना करता येईल.<br>▪ नमुना निवडीच्या विविध तत्त्वांचा योग्य प्रकारे वापर करून नमुना निश्चित करता येईल, तसेच नैतिकदृष्ट्या योग्य, शिस्तबद्ध व वैज्ञानिक पद्धतीने विदा संकलन करून स्वतंत्र संशोधन प्रक्रियेची मांडणी करता येईल.<br>▪ प्राथमिक आणि दुय्यम विदांचा वापर करून योग्य विश्लेषण करता येईल आणि सांख्यिकीय पद्धती वापरता येतील.<br>▪ परिकल्पना मांडून तिची शास्त्रीय पद्धतीने चाचणी व विश्लेषण करता येईल, तसेच संशोधन अहवाल लेखनातील संपादन, आकृतीबंध, संदर्भ लेखन व संगणकाचा वापर यासंबंधीचे कौशल्य आत्मसात करता येईल. |
| 8. | | | | सार्वजनिक अर्थशास्त्र (ECO507) | ▪ सार्वजनिक वस्तू, बाजारातील अपयश व सार्वजनिक खर्चाचे स्वरूप यांवर सूक्ष्म विश्लेषण करू शकतील.<br>▪ कर प्रणाली, करारोपणाचे परिणाम, काळा पैसा आणि विकसनशील अर्थव्यवस्थेतील करसंकलनाच्या मर्यादा समजून घेतील.<br>▪ भारताच्या अंदाजपत्रकातील प्रवृत्ती, सामाजिक खर्च व अनुदान धोरण याचे विवेचन करू शकतील.<br>▪ राजकोषीय आणि मौद्रिक धोरणातील परस्परावलंबन आणि GST, सेवा कर यासारख्या महत्त्वाच्या आर्थिक सुधारणांचा परिणाम मांडू शकतील.<br>▪ राजकोषीय संघराज्यवाद, वित्त आयोग व स्थानिक सरकारांची आर्थिक कार्यक्षमता यांचे चिकित्सक विश्लेषण करू शकतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9. | | | | लोकसंख्याशास्त्र (ECO508) | ▪ लोकसंख्या संकल्पनांचे शास्त्रीय दृष्टिकोन व भारताच्या लोकसंख्येचा ऐतिहासिक अभ्यास प्रभावीपणे समजून घेतील.<br>▪ लोकसंख्या वाढीचे माल्थस, पर्याप्तता, संक्रमण सिद्धांत आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीय संदर्भातील परिणाम यांचे विश्लेषण करू शकतील.<br>▪ जन्मदर, मृत्युदर, जनन अभ्यास व स्थलांतर या घटकांचा अभ्यास करून लोकसंख्येतील बदल व त्याचे परिणाम समजू शकतील.<br>▪ लोकसंख्या व पर्यावरण, आरोग्य व दारिद्र्य यांच्यातील परस्परसंबंध समजून घेऊन शाश्वत विकासासंदर्भात विचार करू शकतील.<br>▪ मानव संसाधन विकास, मानव विकास निर्देशांक आणि लोकसंख्या धोरणांचे चिकित्सक आकलन साधून, भारतीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील लोकसंख्या वाढीच्या समस्या व उपाययोजनांवर सूक्ष्म व समालोचनात्मक दृष्टिकोन विकसित करता येईल. |
| 10. | | | | वाहतूक व दळणवळणाचे अर्थशास्त्र (ECO509) | ▪ वाहतूक व दळणवळण व्यवस्थेचे वर्गीकरण, कार्य, महत्त्व व एकात्मतेची संकल्पना स्पष्ट करता येईल.<br>▪ भारतातील रस्ते, रेल्वे, जल व हवाई वाहतूक प्रणालींची स्थिती, धोरणे व समस्यांचे सखोल विश्लेषण करता येईल.<br>▪ दळणवळण व संपर्क माध्यमांचा विकास प्रक्रियेत होणारा आर्थिक व सामाजिक प्रभाव समजावून सांगता येईल.<br>▪ सार्वजनिक व खाजगी दळणवळण व्यवस्थांची कार्यक्षमता, जाहिरात क्षेत्रातील भूमिका व आधुनिक प्रवृत्तींचे विश्लेषण करता येईल.<br>▪ दळणवळण क्षेत्रातील समस्यांचे विश्लेषण करून व्यवहार्य उपाययोजना सुचवता येतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11. | | | | आर्थिक विचारांचा विकास – II (ECO510) | ▪ विसाव्या शतकातील प्रमुख आर्थिक संकल्पना, नवविचारप्रवृत्ती, तसेच नोबेल पुरस्कार विजेत्यांच्या सिद्धांतांचे विश्लेषण करून त्यांचा समकालीन अर्थव्यवस्थेवरील प्रभाव समजून घेता येईल.<br>▪ स्थैतिक व गतिज संतुलन, वित्त, मौद्रिक अर्थशास्त्र व कल्याणकारी अर्थशास्त्राचे तात्त्विक माहिती स्पष्ट करू शकतील.<br>▪ प्राचीन भारतीय अर्थविचार, तसेच रानडे, दादाभाई नौरोजी, नेहरू, गांधी, आंबेडकर यांचे आर्थिक विचार व धोरणात्मक दृष्टिकोन समजावून सांगू शकतील.<br>▪ भारतातील समकालीन आर्थिक व सामाजिक विचारवंतांचे विश्लेषण करू शकतील, जसे की – अमर्त्य सेन, जगदीश भगवती इत्यादी.<br>▪ जागतिक आणि भारतीय आर्थिक विचारातील साम्य, फरक व त्यांचा विकासक्रम हे समजून घेऊन समग्रदृष्ट्या आकलन करू शकतील. |
| 12. | | | | वित्तीय अर्थशास्त्र (ECO511) | ▪ वित्तीय व्यवस्थेच्या कार्यपद्धती आणि घटकांची माहिती स्पष्टपणे देऊ शकतील.<br>▪ वित्तीय बाजारातील व्यवहार, साधने आणि धोरणांचा सखोल अभ्यास करू शकतील.<br>▪ गुंतवणुकीसाठी व्यवहार्य पर्यायांची निवड आणि मूल्यांकन करू शकतील.<br>▪ जोखीम ओळखून त्यावर उपाययोजना करणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी करू शकतील.<br>▪ भारतीय देयक आणि समायोजन प्रणालीतील नवीन तंत्रज्ञान आणि संरचनेचा उपयोग समजावून सांगू शकतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ▪ आर्थिक आरोग्य, रोखप्रवाह आणि मालमत्ता किंमत निर्धारणाचा व्यावसायिक आढावा घेऊ शकतील. |
| 13. | | | | वर्तनाचे अर्थशास्त्र (ECO512) | ▪ वर्तनाचे अर्थशास्त्र आणि पारंपरिक अर्थशास्त्र यामधील तात्त्विक व व्यवहार्य फरक स्पष्ट करता येतील.<br>▪ निर्णय प्रक्रियेतील अपूर्णता, पूर्वग्रह, मानसिक मर्यादा आणि तर्कशुद्धतेच्या अडचणी समजावून सांगता येतील.<br>▪ मानसिक लेखांकन, जोखीम, अनिश्चितता आणि आंतरकालीन निवडीचा सामाजिक व वैयक्तिक निर्णयांवर होणारा प्रभाव विशद करता येईल.<br>▪ सामाजिक नियम, विश्वास, सहकार्य इत्यादींचा आर्थिक वर्तनावर होणारा प्रभाव प्रयोगांद्वारे स्पष्ट करता येईल.<br>▪ वर्तनात्मक अंतर्दृष्टी आणि प्रायोगिक संशोधनांचा वापर करून सार्वजनिक धोरणांची सुधारणा व स्थानिक समस्यांचे समाधान सुचवता येईल. |
| 14. | | | | क्षेत्रीय प्रकल्प (ECO513) | ▪ अभ्यास विषयाच्या अनुषंगाने निर्देशिनास आलेल्या सामान्य किंवा स्थानिक समस्यांबाबत सजगता येते.<br>▪ संकल्पना आणि व्यावहारिक जीवन यांच्यातील सहसंबंधांची जाणीव होते<br>▪ माहिती व आकडेवारी गोळा करण्याचे कौशल्य विकसित होते.<br>▪ प्रत्यक्ष सहभागी होऊन प्रश्नांची सोडवणूक करताना व्यक्तिमत्व विकास होतो.<br>▪ संस्थात्मक पातळीवरील समस्यांचे स्वरूप ओळखून उपाय सुचविण्याची क्षमता विकसित होते. |
| 15. | | | | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त (ECO602) | ▪ आंतरराष्ट्रीय व्यापाराची उत्पत्ती, त्याचे लाभ व मर्यादा यांचा सखोल अभ्यास करू शकतील.<br>▪ जागतिक व्यापार धोरणांची तुलना व विश्लेषण करून विविध देशांमधील व्यापार व्यवस्थेतील फरक समजून घेता येतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ▪ शोधन शेष व विनिमय दरासंबंधी संकल्पना आत्मसात करून, भारताच्या रुपयाच्या विनिमय दर धोरणाचे विश्लेषण करू शकतील.<br>▪ भारताच्या परकीय व्यापारातील घट व वाढ यांची कारणमीमांसा करून, धोरणात्मक उपायांची मांडणी करता येईल.<br>▪ जागतिक आर्थिक संस्था, करार व परिषदांमधून जागतिक व्यापार व्यवस्थेतील सुसंवाद व संघर्ष यांचा अभ्यास करता येईल. |
| 16. | | | | वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र (ECO603) | ▪ आर्थिक विकास आणि वृद्धीशी संबंधित गुंतागुंतीच्या संकल्पना स्पष्टपणे समजावून सांगू शकतील आणि त्यांचे वास्तविक जीवनातील उपयोग ओळखू शकतील.<br>▪ विविध आर्थिक वृद्धी प्रतिमानांचे (उदा. हॅरोड-डोमर, सोलो) गंभीरपणे विश्लेषण करू शकतील आणि विकासातील संरचनात्मक बदलांचे महत्त्व स्पष्ट करू शकतील.<br>▪ दारिद्र्य, विषमता आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित आर्थिक समस्यांचे विश्लेषण करू शकतील आणि त्यांच्या निराकरणासाठी संभाव्य धोरणात्मक उपायांवर चर्चा करू शकतील.<br>▪ विकसनशील देशांच्या संदर्भात आर्थिक वाढीचे घटक, अडथळे आणि धोरणात्मक पर्यायांवर आधारित योग्य शिफारसी तयार करू शकतील.<br>▪ ऐतिहासिक वाढीचे अनुभव आणि समकालीन विकास मॉडेल (उदा. चीन) यांचा अभ्यास करून ते आपल्या देशाच्या संदर्भात त्यांचे महत्त्व आणि उपयोजन स्पष्ट करू शकतील. |
| 17. | | | | संख्याशास्त्रीय पद्धतींची ओळख | ▪ सामाजिक व आर्थिक विदेचे शास्त्रोक्त सादरीकरण करून विश्लेषणात्मक निष्कर्ष काढू शकतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | (ECO604) | ▪ सरासरी, माध्य, बहुलक, विचलन आदी संख्याशास्त्रीय मोजमापे अचूकपणे वापरता येतील.<br>▪ संख्याशास्त्रीय पद्धतीच्या वापराचे कौशल्य विकसित होईल.<br>▪ विविध आर्थिक समस्यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येईल आणि त्या अनुषंगाने योग्य निर्णय घेता येतील.<br>▪ संभाव्यता व वितरण पद्धतींच्या आधारे विद्यार्थ्यांना अनिश्चितता व्यवस्थापन आणि जोखमीचे विश्लेषण करता येईल. |
| 18. | | | | अर्थशास्त्राचे तत्वज्ञान (ECO605) | ▪ अर्थशास्त्राच्या तत्त्वज्ञानातील विविध विचारप्रवाहांची सखोल समज प्राप्त करतील.<br>▪ वैज्ञानिक पद्धती व विचारसरणींचा अर्थशास्त्रीय विश्लेषणात वापर करता येईल.<br>▪ आर्थिक निर्णयप्रक्रियेतील तत्त्वज्ञानिक व नैतिक मुद्द्यांची ओळख होईल.<br>▪ वर्तणूक अर्थशास्त्र व कल्याणकारी मूल्यांचा व्यवहारात उपयोग समजेल.<br>▪ स्वतंत्र, तार्किक व संशोधनक्षम विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल. |
| 19. | | | | कराधान (ECO607) | ▪ करप्रणालीचा ऐतिहासिक, वैचारिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून सखोल विश्लेषण करू शकतील.<br>▪ कराधानाचे विविध आर्थिक सिद्धांत (उदा. कराचा आघात, करांतरण, इष्टतम कराधान) वास्तविक जीवनातील परिस्थितीमध्ये लागू करू शकतील.<br>▪ भारताच्या जटिल संघराज्यीय करप्रणाली, तिचे संवैधानिक पैलू आणि सध्याच्या समस्या स्पष्टपणे समजू शकतील आणि त्यांचे विश्लेषण करू शकतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ▪ भारतातील विविध कर सुधारणांचे (उदा. उदारीकरणपूर्व आणि पश्चात) मूल्यमापन करू शकतील आणि त्यांचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करू शकतील.<br>▪ करांच्या अर्थव्यवस्थेवरील परिणामांचे मूल्यांकन करून, कर धोरणांमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी किंवा नवीन धोरणे आखण्यासाठी तर्कशुद्ध शिफारसी करू शकतील. |
| 20. | | | | औद्योगिक अर्थशास्त्र (ECO606) | ▪ भारतातील औद्योगिकीकरणाच्या इतिहासाचे टप्पे आणि विकासप्रक्रिया स्पष्ट करता येईल.<br>▪ विविध प्रकारच्या उद्योगांचे आर्थिक विश्लेषण व त्यांचे राष्ट्रीय विकासातील योगदान समजावता येईल.<br>▪ औद्योगिक धोरण, परकीय भांडवल आणि धोरणात्मक निर्णयांचा प्रभाव विशद करता येईल.<br>▪ औद्योगिक संघटन, उत्पादन व किंमत पद्धती यावर सैद्धांतिक व व्यावहारिक चर्चा करता येईल.<br>▪ निवडक उद्योगांचे विश्लेषण, समस्यांचे निराकरण आणि नवोन्मेष धोरणांची समज विकसित होईल. |
| 21. | | | | संशोधन प्रकल्प (ECO600) | ▪ अभ्यास विषयाच्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या सामान्य/ स्थानिक समस्यांबाबत सजगता येते.<br>▪ संकल्पना आणि व्यावहारिक जीवन यांच्यातील सहसंबंध स्पष्ट होतो.<br>▪ समस्या सुत्रण, तथ्य संकलन आणि माहितीचे विश्लेषण करण्याची कौशल्ये विकसित होतात.<br>▪ संस्थात्मक पातळीवरील समस्यांचे स्वरूप ओळखून उपाय सुचविण्याची क्षमता विकसित होते.<br>▪ प्रत्यक्ष सहभागी होऊन प्रश्नांची सोडवणूक करताना व्यक्तिमत्व विकास साध्य होतो. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 22. | | | | आधुनिक आर्थिक सिद्धांत (ECO615) | ▪ जोखीम व अनिश्चितता असलेल्या स्थितीत उपभोक्त्याच्या वर्तनाचे विश्लेषण करू शकतील.<br>▪ मागणी आणि उत्पादनाच्या आधुनिक व अलीकडील सिद्धांतांवर आधारित विश्लेषण सादर करू शकतील.<br>▪ केन्सियन सिद्धांत, गुंतवणूक मॉडेल्स आणि उत्पन्ननिर्धारणातील गुंतागुंतीचे घटक समजावून सांगू शकतील.<br>▪ IS-LM मॉडेलचे विश्लेषण करून समष्टी संतुलन व धोरणात्मक निर्णयांवर प्रभावी मते मांडू शकतील.<br>▪ विविध आर्थिक धोरणांची तुलनात्मक प्रभावीता सांख्यिकीय व सैद्धांतिक दृष्टिकोनातून विश्लेषित करू शकतील. |
| 23. | | | | पर्यावरणाचे अर्थशास्त्र (ECO616) | ▪ पर्यावरणीय अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना व सिद्धांत स्पष्टपणे समजावून सांगतील.<br>▪ पर्यावरण आणि आर्थिक प्रणालींमधील परस्परसंबंधांचे विश्लेषण सैद्धांतिक आणि वास्तवदृष्ट्या करतील.<br>▪ शाश्वत विकास, हवामान बदल, व्यापार आणि पर्यावरणीय न्याय यांसारख्या आंतरशाखीय मुद्द्यांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करतील.<br>▪ भारतातील व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यावरणीय धोरणे, कायदे व नियमन यांचा अभ्यास व मूल्यमापन करतील.<br>▪ पर्यावरणीय सार्वजनिक वस्तू, कल्याण निकष आणि धोरण साधने यांचा वापर करून पर्यावरणीय समस्या सोडवण्याच्या उपायांची मांडणी करतील. |
| 24. | | | | संख्याशास्त्रीय पद्धती आणि विदाचे विविध स्रोत (ECO617) | ▪ परिकल्पना तपासणी, t-चाचणी, ANOVA, इ अशा संख्याशास्त्रीय पद्धती आत्मविश्वासाने वापरू शकतील.<br>▪ सहसंबंध, समाश्रयन (Regression), कालमालिका विश्लेषण करण्याची व अंदाज वर्तविण्याची क्षमता विकसित होईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ▪ विविध राष्ट्रीय (उदा. जनगणना, NSSO सर्व्हे इ) व आंतरराष्ट्रीय विदास्रोतांची माहिती होईल व त्याचा उपयोग समजेल.<br>▪ आर्थिक संशोधन प्रकल्प, धोरण विश्लेषण व अहवाल लेखन करण्यासाठी तयारी होईल.<br>▪ विदा विश्लेषणाकरिता आवश्यक असणारा शास्त्रीय दृष्टिकोन विकसित होईल. |
| 25. | | | | भारतीय अर्थव्यवस्था (ECO618) | ▪ भारतीय अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धती आणि विकासाच्या विविध टप्प्यांची समजूत घडवून आणतील.<br>▪ मानव विकास, लोकसंख्या वाढ आणि शाश्वत विकास यामधील परस्परसंबंध समजून घेता येतील तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक व पर्यावरणीय आव्हानांचे विश्लेषण करता येईल.<br>▪ सामाजिक व आर्थिक समस्यांचे सखोल विश्लेषण करून रोजगार, उत्पन्न व उत्पादनासंदर्भातील प्रश्नांचे आकलन करता येईल आणि योग्य उपाययोजना सुचवण्याची क्षमता विकसित होईल.<br>▪ भारताच्या कृषि, उद्योग व सेवा क्षेत्रातील धोरणात्मक बदल ओळखण्याची क्षमता विकसित होईल.<br>▪ वित्तीय संस्था, भांडवली बाजार आणि चलनविषयक धोरणांची कार्यप्रणाली समजून घेता येईल तसेच जागतिक व्यापारातील भारताची भूमिका व जागतिकीकरणासोबतच देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींचे सखोल मूल्यमापन करता येईल. |
| 26. | | | | अर्थमितीची ओळख (ECO619) | ▪ अर्थमितीचा वापर करून आर्थिक धोरणांचे परिणाम वस्तुनिष्ठ पद्धतीने विश्लेषित करू शकतील. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ▪ अर्थमितीय पद्धतींचा वापर करून अर्थशास्त्रीय संकल्पनांचे व्यवहार्य परीक्षण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल.<br>▪ आर्थिक विश्लेषण करताना येणाऱ्या समस्या (जसे की बहुरेषीयता, अनेकिवध प्रकीर्णता, स्वयं-संबंध इ) ओळखून त्या सुधारण्याचे कौशल्य मिळेल.<br>▪ प्रगत अर्थमितीय पद्धती वापरून धोरण विश्लेषण, भविष्यानुमान आणि संशोधन निष्कर्ष अधिक प्रभावीपणे मांडता येतील.<br>▪ संशोधन प्रकल्प व व्यावसायिक कामकाजासाठी आवश्यक असणारे तांत्रिक व विश्लेषणात्मक कौशल्य प्राप्त होईल. |
| 27 | | | | संशोधन प्रकल्प (ECO699) | ▪ अभ्यास विषयाच्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या सामान्य/ स्थानिक समस्यांबाबत सजगता येते.<br>▪ संकल्पना आणि व्यावहारिक जीवन यांच्यातील सहसंबंध स्पष्ट होतो.<br>▪ विविध घटक, घटना आणि घडामोडीतील कार्यकारण संबंध प्रतिपादन करण्यास सक्षम होतात.<br>▪ समस्या सुत्रण, तथ्य संकलन आणि माहितीचे विश्लेषण करून उपाय सुचविण्याची क्षमता विकसित होते.<br>▪ संशोधनाच्या माध्यमातून पूर्वज्ञानाचे अवलोकन करून नवीन ज्ञान निर्मितीस सक्षम होतात.<br>▪ संशोधन अनुभवाच्या माध्यमातून प्रश्नांची उकल करताना व्यक्तिमत्त्व विकास साध्य होतो. |